स्पर्धात्मक युगात सॉफ्ट स्किलचा अभ्यास आवश्यक - सौ. श्रद्धा शिंदे

"शैक्षणिक व करियर कार्यक्षेत्रातील गुणवत्ता उंचावण्यासाठी तसेच वाढत्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सक्षमपणे टिकून राहण्यासाठी विविध सॉफ्ट स्किल्स अंगी बाळगणे गरजेचे आहे. मुलाखत तंत्र, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, रिझ्युम रायटिंग , मुलाखतीची पूर्व तयारी, मुलाखतीसाठी ड्रेसकोड, नीटनेटकेपणा, आत्मविश्वासपूर्वक उत्तरे देणे, संवाद कौशल्य, आदर्श परीचय पत्र कसे तयार करावे. या बाबींचे सखोल ज्ञान असणे गरजेचे आहे. "असे प्रतिपादन सौ. श्रद्धा शिंदे, श्रद्धा सॉफ्ट स्किल अकॅडमी, कोल्हापूर यांनी केले. त्या श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे बोलत होत्या. अभ्यासक्रमातील तांत्रिक ज्ञानाबरोबरच सर्जनशील व्यक्तिमत्त्व, प्रभावी देहबोली आणि संघभावना अशा सॉफ्ट स्कीलचे ज्ञान व्हावे, यासाठी श्री व्यंकटेश  महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘स्फॉफ्ट स्कील अँड  इंटरव्यू टेक्निक ’ या विषयावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इंग्लिश अससोसिएशन मार्फत व्याख्यान आयोजित केले.  यासाठी सौ. श्रद्धा अभिजित शिंदे या प्रमुख व्याख्यात्या म्हणून लाभल्या. त्यानी . इंग्लिश असोसिएशन च्या प्रमुख डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख अतिथींची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात स्वतःला टिकवण्यासाठी विविध कौशल्य अंगी बाळगले पाहिजे असे सांगितले. तसेच मुलाखत हे एक तंत्र आहे. मुलाखतीस सामोरे जाताना विविध अंगांनी पूर्वतयारी आवश्यक आहे. मुलाखत देताना बुद्धिचातुर्य, चाणाक्षपणा, हजरजबाबीपणा, आचार-विचार आदींचे प्रतिबिंब उमटत असते. या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. आर. ठाकर यांनी केले. आभार प्रा. एच. एस. वडेर यांनी केले.


" Soft Skills and Interview Techniques"